

## श्री.गुलाब ठाकरे सहसंचालक, तंत्रशिक्षण, नागपूर विभाग या पदावर रूजू

नागपूर : तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई येथे कार्यरत असलेले श्री.गुलाब ठाकरे यांना शासनाने नियमित पदोन्नती दिलेली असून त्यांची पदोन्नतीने नियुक्ती तंत्रशिक्षण नागपूर विभागाचे सहसंचालक या पदावर करण्यात आलेली आहे. श्री.गुलाब ठाकरे हे या पदावर दिनांक १५ सप्टेंबर, २०११ रोजी रूजू झालेले आहेत. त्यांनी डॉ.आर.एस. नायडू, प्र.सहसंचालक यांचेकडून सहसंचालक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

श्री.गुलाब ठाकरे हे मुळचे नागपूर येथील रहिवाशी असून ते मुळचे स्थापत्य अभियंते आहेत. त्यांचे पदवी व पदव्युत्तर शिक्षण शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती व व्ही.एन.आय.टी. नागपूर येथे झालेले आहे.

श्री.गुलाब ठाकरे यांना तंत्र शिक्षण विभागामध्ये २५ वर्षाचा एकत्रित अनुभव असून त्यापैकी १७ वर्षाचा प्रशासकीय पदावर काम करण्याचा अनुभव आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी पुणे, औरंगाबाद, नागपूर व मुंबई मुख्यालय येथे विविध पदांवर कार्य केलेले आहे. श्री.गुलाब ठाकरे हे यापूर्वी सुध्दा १९९७ ते २००६ या कालावधीत याच कार्यालयात सहाय्यक संचालक (तांत्रिक) या पदावर कार्यरत होते.

श्री.ठाकरे यांच्या पदोन्नतीने नागपूर विभागामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांचेवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.